विशेष दरखास्त क्र.११/२०१७

बळीराजा ग्रामीण पतसंस्था मर्या.मंगळवेढा

वि.

बाळु सिताराम यादव

**<u>आदेश निशाणी क्र. २७ वर</u>**

ऋणको क्र.१ बाळु सिताराम यादव यांचे विरुध्द दरखास्त रक्कम वसुलीसाठी तुरुंग वारंट पाठवण्यात यावे यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे. धनको यांनी नि.क्र.३२ प्रमाणे प्रतिज्ञापत्र देऊन रक्कम रुपये ९,२८,७००/–व त्यापुढील व्याज ऋणको यांचेकडुन येणे बाकी आहे, असे नमुद केले आहे.

२. त्यावर ऋणको यांनी सविस्तर म्हणणे दाखल केलेले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २१ रुल २२ प्रमाणे कोणतीही चौकशी न होता तुरुंग आदेश देण्यात आला होता. प्रस्तुत दरखास्त रक्कम वसुलीसाठी आहे. त्यानुसार चौकशी होऊन प्रथम जप्ती वारंट काढावे, त्यानंतर तुरुंग वारंट का काढु नये यासाठी नोटीस देऊन त्यानंतरच ऋणको यांचे विरुध्द तुरुंग वारंट काढण्याचा आदेश करणे गरजेचे आहे. ऋणको क्र.१ यांनी नि.क्र.२३ प्रमाणे दरखास्तला त्यांचे सविस्तर म्हणणे दिलेले आहे. त्याचा विचार करुन प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले.

३. सहकार न्यायालय, सोलापूर यांनी सहकार वाद क्र.२५४/२०१५ मध्ये दिनांक २८.०६.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार रक्कम वसुलीसाठी प्रस्तुत दरखास्त दाखल करण्यात आलेली आहे. ऋणको क्र.१ हे या प्रकरणात हजर झालेले आहेत. त्यांनी नि.क्र.२३ प्रमाणे त्यांचे सविस्तर म्हणणे दिलेले आहे. त्यामध्ये केवळ प्रस्तुत हुकुमनामा हा अंमलबजावणीस योग्य नाही असे मोघम विधान केलेले आहे. या हुकुमनामाची अंमलबजावणी का करता येणार नाही याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे ऋणको क्र.१ यांनी दिलेले म्हणणे नि.क्र.२३ मधील आक्षेपामध्ये तथ्य दिसुन येत नाही.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २१ रुल २२ प्रमाणे नोटीस ऋणको यांना दिली पाहिजे. प्रथम जंगम वारंटचा आदेश करुन जर रक्कम वसुल झाली नाही तर दिवाणी तुरुंगात का ठेवु नये यासाठी कारणे दाखवा नोटीस व त्यानंतरच ऋणको यांना दरखास्त रक्कम वसुलीसाठी दिवाणी तुरुंगात ठेवणासाठीचा आदेश करता येऊ शकतो असे ऋणको क्र.१ यांचे म्हणणे आहे.

५.		या प्रकरणामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २१ रुल २२ प्रमाणे नोटीसची बजावणी ऋणको क्र.१ यांना झालेली आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.२३ वर दिलेले आहे. त्या म्हणणे मध्ये तथ्य नाही असे माझे मत मी नोंदवलेले आहे.

६.		दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २१ रुल ३० प्रमाणे रक्कम वसुलीसाठी हुकुमनामा जर असेल तर त्याची अंमलबजावणी ऋणको यांना दिवाणी तुरुंगात ठेवुन, किंवा त्यांची मालमत्ता जप्त व विक्री करुन किंवा दोनही प्रकारे करता येते. जंगम वारंट पाठवुन देखील जर हुकुमनामामधील रक्कम वसुल झाली नाही तरच ऋणको यांना दिवाणी तुरुंगात ठेवता येईल अशी कोणतीही तरतुद नाही.

७.		या प्रकरणामध्ये ऋणको क्र.१ हे हजर आहेत. पुरेशी संधी देऊनही त्यांनी हुकुमनामा प्रमाणे रक्कम दिलेली नाही. ऋणको क्र.१ यांचेकडे रक्कम रुपये ९,२८,७००/–व त्यावरील व्याज येणे बाकी आहे असे धनको यांनी प्रतिज्ञापत्र देऊन नमुद केलेले आहे. निशाणी क्र.२७ वरील अर्जावर ऋणको क्र.१ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. हुकुमनामाप्रमाणे रक्कम ऋणको क्र.१ यांचेकडुन वसुल करण्यासाठी तुरुंग वारंट शिवाय कोणताही पर्याय दिसुन येत नाही. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१.	अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२.	ऋणको क्र.१ बाळु सिताराम यादव यांचेकडुन रक्कम रुपये ९,२८,७००/– व त्यापुढील व्याज वसुल होऊन मिळण्यासाठी त्यांना दिवाणी कैदेत ठेवण्यात येत आहे.

३.	धनको यांनी निर्वाह भत्ता जमा केलेला असेल तितकेच दिवस ऋणको क्र.१ यांना दिवाणी कैदे मध्ये ठेवता येईल.

दिनांक : २४/०१/२०२०

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : 24.01.2020 |
| d | Order signed by P.O. on | : 24.01.2020 |
| e | Order uploaded on | : 24.01.2020 |